# डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ,
# छत्रपती संभाजीनगर

## सामान्य प्रशासन विभाग
## परिपत्रक/२०२५

विषयः- **TA/DA देयक मंजुरीसाठी गेट पास घेण्याबाबत.**

डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाचे सर्व व्यवस्थापन परिषद सदस्य तसेच विद्यापीठातील विविध बैठकीसाठी उपस्थित राहणारे असे सदस्य की ज्यांनी मा. कुलगुरूंची रीतसर वाहन वापरण्याची परवानगी घेतली आहे, अशा सर्व सदस्यांना या परिपत्रकाद्वारे कळविण्यात येते की, विद्यापीठात बैठकीस उपस्थित राहण्याच्या दिवशी विद्यापीठाच्या मुख्य प्रवेशद्वारावर असणाऱ्या सुरक्षारक्षकाकडे असणाऱ्या नोंदवहीवर नोंद करून गेट पास घ्यावा.

सदरील गेट पास TA/DA देयकासोबत जोडणे अनिवार्य राहील; अन्यथा त्याशिवाय देयके पारीत केली जाणार नाहीत, याची कृपया नोंद घ्यावी.

विद्यापीठ प्रांगण, )(
छत्रपती संभाजीनगर- ४३१ ००४ )(
संदर्भ :- सा.प्र./२०२५/406 )(
दिनांक :- ३०-१०-२०२५ )(

**कुलसचिव**

या परिपत्रकाची प्रतः-

१) सर्व व्यवस्थापन परिषद सदस्य, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, छत्रपती संभाजीनगर.
२) वाहन वापरण्याची मा. कुलगुरूंची परवानगी घेतलेले सदस्य/ वाहन वापरण्याची परवानगी असलेले सदस्य यांना कळविण्यात येते की, त्यांनी विद्यापीठात बैठकीसाठी उपस्थित राहतेवेळी विद्यापीठाच्या मुख्य प्रवेशद्वारावर असणाऱ्या सेक्युरिटी गार्डकडून गेट पास घेणे बंधनकारक आहे. गेट पास घेऊन TA/DA देयकासोबत जोडल्याशिवाय देयक पारीत केले जाणार नाही.
३) जनसंपर्क अधिकारी, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, छत्रपती संभाजीनगर.
४) संचालक, युनिक, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, छत्रपती संभाजीनगर यांना देऊन कळविण्यात येते की, सदरील परिपत्रक विद्यापीठ संकेतस्थळावर उपलब्ध करून द्यावे.
५) सुरक्षा अधिकारी, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, छत्रपती संभाजीनगर यांना देऊन कळविण्यात येते की, सदर परिपत्रकाची नोंद घेऊन, विद्यापीठात बैठकीसाठी उपस्थित राहणाऱ्या सदस्यांना विद्यापीठाच्या मुख्य प्रवेशद्वारावर नोंदवहीत नोंद करून गेट पास देण्यात यावेत.